ISBN : 978-93-86077-12-7

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" - कर्मवीर





रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

नॅक पूर्नमूल्यांकन 'बी' ग्रेड (CGPA 2-66)

Email: acscollegehpr@yahoo.co.in

विद्यापीठ अनुदान आयोग अनुदानित

## एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र

विषय

# "पंचायत राज्यव्यवस्थेमध्ये महिलांचा सहभाग : समस्या आणि उपाय"



आयोजक

## राज्यशास्त्र विभाग

## चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी

ISBN : 978-93-81549-93-3

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | महिला सबलीकरण घटनात्मक व कायदेशीर तरतुदी व 73 वी घटनादुरूस्तीने महिलांचा सहभाग – एक अभ्यास | प्रा. डॉ. व्ही. एम. पाटील | 1 |
| 2. | पंचायतराज आणि स्त्रियांचे राजकीय सक्षमीकरण | तेजस्विनी महादेव पोवार | 6 |
| 3. | महिला अत्याचार संरक्षण कायदा, अधिकार आणि नाती | डॉ. मनोज पिंपळे<br>प्रा. विराग गांवडे | 9 |
| 4. | पंचायतराज व्यवस्था : महिला विकासासाठी पोषक | श्रावण धोंडीराम पाटील | 11 |
| 5. | महाराष्ट्रातील पंचायत राज्याची सद्यःस्थिती: स्त्रियांचा सहभाग | प्रा. शोभा संभोजी | 14 |
| 6. | ग्रामविकासात महिलांचे योगदान आणि महिला सबलीकरणाची आवष्यकता | डॉ. संतोष मारुती भोसले (अर्थशास्त्र) | 17 |
| 7. | घरकाम करणाऱ्या महिलांमधील स्व–आत्मविश्वास व ताण अभ्यासणे | डॉ. कदम झुंजारराव श्रीमंत | 21 |
| 8. | मानवाधिकार आणि स्त्रियांचे षेषण | प्रा.सत्यवान पुंडलिक बनसोडे | 24 |
| 9. | पंचायत राज्यातील महिलांचा सहभाग | प्रा.डॉ.एस.एम.गावडे | 28 |
| 10. | निर्णय निर्धारण प्रक्रियेतील महिलांचा सहभाग | प्रा.संध्या ज. माने | 33 |
| 11. | पंचायत राजव्यवस्थेत महिलांचा सहभाग समस्या व उपाय | सौ. मनिषा नाईक | 36 |
| 12. | स्त्री सबलीकरण | प्रा. चंद्रकांत गिरी | 39 |
| 13. | पंचायतराज्य आणि महाविद्यालयीन युवती | पाटील सुहास रघुनाथ | 41 |
| 14. | शारदाबाई गोविंदराव पवार – एक कर्तृत्व व संपन्न स्त्री | सुशांत नंदकुमार नलवडे | 45 |
| 15. | पंचायत राज्य व्यवस्थेतील महिलांचा सहभाग आणि निर्णय स्वातंत्र्य | डॉ. सौ. उर्मिला महेश चव्हाण | 48 |
| 16. | महिला आरक्षण आणि राज्यकारभारातील कियाशीलता | डा. भगवान माने | 51 |
| 17. | महाराष्ट्रातील पंचायतराज महिलांचा सहभाग आणि सबलीकरण | सौ.कोठावळे श्रध्दा विनोद<br>डॉ.शिवाजी सुबराव पाटील | 59 |
| 18. | पंचायत राज्यव्यवस्थेमध्ये काम करणाऱ्या महिलांसमोरील समस्या | डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले. | 66 |
| 19. | संशोधनाचा विशय – ग्रामीण महिलांच्या राजकीय नेतृत्वा विकासात लोक संचलीत साधन केंद्राची भूमिका | प्रा.कर्णराज लक्ष्मण रणदिवे | 69 |
| 20. | महिला कल्याण करीता पंचायतराज्य मार्फत राबविल्या जाणाऱ्या समाज उपयोगी योजनांचा –संक्षीप्त अर्थशास्त्रीय अभ्यास | डॉ. अस्मिता एम. प्रधान<br>श्री. संतोष टी. बिरनाळे | 72 |

ISBN : 978-93-86077-12-7

# स्त्री सबलीकरण

प्रा. चंद्रकांत गिरी
सहाय्यक प्राध्यापक
चंद्राबाई–शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी
जि. कोल्हापूर

प्रस्तावना –

परंपरागत अवस्थेतून आधुनिकतेकडे वाटचाल सुरु असताना मोठ्या प्रमाणात सामाजिक परिवर्तनाला सामोरे जावे लागते. आधुनिक भारतातील स्त्रियांचा दर्जा व सामाजिक स्थान लक्षात घेण्याअगोदर यापूर्वीची परिस्थिती कशी होती हे लक्षात घ्यावे लागते.

धर्मग्रंथात स्त्री विषयक वेगवेगळे विचार आढळतात. ज्या मनूने एकीकडे स्त्रीचा देवता म्हणून गौरव केला. त्याच मनूने नस्त्री स्वातंत्र्य अर्हती म्हणजे स्त्रीला स्वातंत्र्य देण्याची लायकी नाही, तिचे रक्षण पिता, पती आणि पुत्रानी केले पाहिजे असे म्हटले आहे. नैतिक आणि सामाजिक मूल्यांचा ऱ्हास, आर्थिक दैन्यावस्था, जातीय वैमनस्य, सत्ताधीशांचे जीवनताच ज्ञान या सर्वाचा भारतीय स्त्री जीवनावर गंभीर परिणाम घडून आला. स्त्री जीवनाची अधोगती होत असताना ही परिस्थिती सावरण्यासाठी वेगवेगळ्या पातळीवरुन प्रयत्न होत गेले त्यातूनच स्त्री जीवनातील परिवर्तनवादी चळवळीची वाट सुरु झाली.

महाराष्ट्रात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाउराव पाटील यांनी स्त्री परिवर्तनवादी चळवळ सुरु केली. समाजातील अनिष्ठ रुढी, परंपरा, अंधश्रध्दा दूर करावयाच्या असतील तर प्रथम स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे. स्त्री साक्षर झाली पाहिजे. सदर स्त्री साक्षर झाली म्हणजे तिच्या सान्निध्यात, सहवासात येणारी घरातील सर्व मंडळी साक्षरतेचे महत्व ओळखतील. साक्षर होतील त्यातून समाज साक्षर होईल, समाज सुधारला म्हणजे समाज सुधारणेला गती येईल हे उद्दिष्ट समाजसुधारकापुढे होते.

धर्म ग्रंथात आचार, विचार, विवाह न्याय स्त्रियांच्या विषयी नियम करण्यात आले आणि परंपरेने यांना बळकटी मिळत गेली होती. स्त्रियांच्यावर समाजाने अनेक बंधने लादली गेली. यातूनच समाजात बालविवाह, बहुपत्नीत्व, स्त्रीदासत्व, सतीप्रथा, केशवपन, वरदक्षिणा पध्दत, जरठकुमारी विवाह इ. अनिष्ठ प्रथाचा समाजात जन्म झाला. तर विधवांच्या आत्महत्या, राजस्थानमध्ये बालकन्या हत्येची प्रथा रुढ होती. भारतातील रजपूत व जाट इ. लोकांच्या व बालकन्या ही प्रथा होती. कारण रजपूत अनेक घराणी राज्यकर्ती होती. अविवाहीत कन्या घरात ठेवणे हा कलंक मानला जाई. योग्य वर मिळत नसे व योग्य वर मिळाल्यावर लग्नात परंपरेनुसार फार मोठा खर्च करावे लागे. पश्चिम व मध्य भारतात हुंड्याची पध्दतही मोठ्या प्रमाणात होती. ब्राम्हण, भट, भिक्षूक, पौरोहिय यांच्या दक्षिणा व जेवणावेळी, पाहुण्यांचा आदर–सत्कार व जेवणाळी, मेजवाण्या इ. मुळे मुलीचा विवाह म्हणजे मोठे संकट वाटत होते. त्यामुळे कन्येचा जन्म होताच तिला अनेक प्रकारचे उपाय योजून तिची हत्या करत. मुलीचा जन्म होताच तिचा श्वास कोंडूनख तिला अफूसारखे विष देवून, नवजात मुलीचे दूध बंद करुन उपासमार करुन मारत होते. ब्रिटीश सरकारने सन १७९५ ते १८०३ या काळात बालहत्या प्रतिबंधक कायदे करुन बालहत्या बंदीवेळी पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. लॉर्ड बेंटिंग व लॉर्ड हार्डिंग यांनी आपल्या प्रशासकीय अधिकाऱ्यामार्फत बालहत्याविरोधी मोहिम राबविली. त्यांच्या अथक प्रयत्नाने ही दुष्ट प्रथा भारतातील बंद झाली. नवसपूर्तीसाठी बालहत्या केली जात होती. ती इ.स. १८०२ मध्ये कंपनी सरकारने यासंबंधी कायदा केला व ही पध्दती बंद केली. ब्रिटिश व्यापारी, ब्रिटिश अधिकारी, भारतातील श्रीमंत लोक आपली विषयवासना भागविण्यासाठी स्त्री गुलामांना विकत घेत. उत्तर भारतात व दक्षिण भारतातील काही भागात घरकामासाठी व वेश्या व्यवसायासाठी स्त्री–पुरुष गुलाम ठेवत. वरील सर्व बंधनातून स्त्रियांना मुक्त करण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी प्रयत्न करण्यास सुरुवात केली. यामध्ये राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, छ. शाहू महाराज, महर्षी कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाउराव पाटील इ. समाज सुधारक विव्दान यांनी स्त्रियांच्या सुधारणेसाठी पुढाकार घेवून स्त्री उध्दाराचे कार्य केल्याचे दिसून येते. १९ व्या शतकात ही भारतीय स्त्रियांच्या अनेक समस्या आहेत. यामध्ये सर्वात महत्वाचा प्रश्न स्त्रिभ्रुण हत्या, हुंडाबळी, विधवा स्त्रियांचे जीवन, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार इ. होय. भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे भारतातील जास्तीत जास्त लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागात उत्पादनाचे साधन नसल्यामुळे लोकांची आर्थिक परिस्थिती बिकट असते त्यामुळे कुटुंबात शिक्षणाअभावी धर्म, अज्ञान, अंधश्रध्दा, व्रतवैकल्ये, लोकभ्रम, गरीबी इ. गोष्टी असतात. यातूनच या प्रथा–परंपरांची जोपासना केली